# कृषी क्षेत्रात नव्याने संशोधन गरजेचे

## डॉ. विजय भटकर : राहुरी कृषी विद्यापीठात आविष्कार- २०१७ स्पर्धा प्रारंभ

**राहुरी विद्यापीठ, जि. नगर (प्रतिनिधी) :** आजच्या पिढीला हवे व गरजेचे असलेले संशोधन झपाट्याने कालबाह्य होत असून हे संशोधन केवळ अत्यल्प काळामध्येच कालबाह्य होत असून नव्याने व कल्पनेपलीकडील संशोधन गरजेचे असून आजच्या पिढीसमोर हे मोठे आव्हान असल्याचे प्रतिपादन नालंदा विद्यापीठाचे कुलपती व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांनी केले.



**राहुरी : महात्मा फुले कृषी विद्यापीठात अविष्कार२०१७ चे उद्‍घाटन नालंदा कृषी विद्यापीठाचे कुलपती डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले. या वेळी कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा, मिलिंद ढोके, डॉ. किरण कोकाटे, डॉ. शरद गडाख आदी.**

महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये आयोजीत १२ व्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धा 'आविष्कार-२०१७' च्या उद्‍घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा होते. या वेळी व्यासपीठावर गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. चंद्रशेखर भुसारी, संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संचालक संशोधन डॉ. शरद गडाख, अविष्कारचे समन्वयक निरीक्षक डॉ. प्रमोद पाबरेकर, वित्त समिती समन्वयक विवेक साठे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. जगन्नाथ पाटील, नियंत्रक विजय कोते, कुलसचिव डॉ. दिलीप पवार, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके उपस्थित होते.

डॉ. भटकर म्हणाले, की हवामान बदलांच्या आव्हानांना सामोरे जाऊनदेखील आपल्या देशाने कृषी उत्पादनात विविध विक्रम केले आहेत. तरुणांनी कृषी किंवा कृषी पूरक क्षेत्रात पुढे यावे. यापुढे कृषी क्षेत्रालाच भविष्य आहे. जगाच्या वेगवान आणि बदलत्या संस्कृतीत भविष्यात आपल्यासमोर बरेच आव्हाने येणार आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवीन संशोधन आणि कल्पकता हे शिक्षणाचा अविभाज्य भाग होणे गरजेचे आहे. या वेगवान बदलत्या युगात कृषिला माहिती तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर द्या. देशाचे भविष्य तरुणांच्या संशोधनावर अवलंबून आहे. अविष्कारसारखा उपक्रम तरुणांच्या संशोधन बुद्धीला चालना देईल. अध्यक्षीय मार्गदर्शनात कुलगुरू डॉ. विश्वनाथा म्हणाले, हे विद्यापीठ सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत आहे. आत्तापर्यंत विद्यापीठाने एक लाख कृषी पदवीधर दिले आहेत. विविध पिकांचे २५७ वाण विकसित केलेले आहेत. देशातील डाळिंबाखालील ९० टक्के क्षेत्र हे या विद्यापीठान विकसित केलेल्या फुले भगवा वाणाखाली आहे. विद्यापीठाने विकसित केलेल्या उसाचा फुले २६५ या वाणाने राज्याला सात हजार करोड मिळून दिले आहे. विद्यापीठाच्या संशोधनाने शेतकऱ्यांचा कायापालट केला आहे. सूत्रसंचालन प्रेमराज चव्हाण यांनी केले. आभार कुलसचिव पवार यांनी मानले. निरीक्षक ईश्वर मोहरले, प्रशांत गावंडे, अनिता रविकुमार, श्रीकांत पाटील, सर्व कृषी महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सासवड येथे २८ जानेवारीपासून अंजीर परिषदेचे आयोजन

**पुणे (प्रतिनिधी) :** अंजीर फळासाठी प्रक्रिया उद्योगांबरोबरच निर्यातीसाठी संधी उपलब्ध व्हावी, यासाठी संशोधन आणि विकासासाठी अंजीर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल महाराष्ट्र अंजीर उत्पादक आणि संशोधन संघाच्या वतीने या परिषदेचे पहिल्यांदाच आयोजन करण्यात येत असून, २८ जानेवारी रोजी सासवड येथील काळेवाडी येथे परिषद होणार असून, उद्‍घाटन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते होणार असल्याचे संघाचे सचिव सुरेश सस्ते यांनी सांगितले.

श्री. सस्ते म्हणाले, की राज्यात सुमारे ७ हजार हेक्टर अंजिराचे क्षेत्र असून, त्यापैकी १ हजार ५०० हेक्टर क्षेत्र पुणे जिल्ह्यात आहे. पुणे जिल्ह्यातील एकूण क्षेत्रापैकी ९० टक्के क्षेत्र पुरंदर तालुक्यात असून, पुरंदरच्या अंजिराचे विशेष महत्त्व आहे. या अंजिराला नुकतेच भौगोलिक मानांकन मिळाले असून, केवळ मानांकनामुळे प्रश्न सुटलेले नाहीत. अंजिरावर प्रक्रिया उद्योगाबरोबरच निर्यातक्षम आणि टिकवण क्षमता असलेल्या अंजिराचे वाण विकसित होण्याची गरज आहे. यासाठी अंजीर उत्पादक संघाच्या वतीने अंजीर उत्पादक शेतकऱ्यांना एकत्र आणत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी परिषद आयोजनाचा प्रयत्न आहे.

परिषदेमध्ये अंजीर उत्पादन व उत्पादकांच्या समस्येवर विविध तज्ज्ञ, संशोधक, धोरणकर्ते मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राज्य फलोत्पादन व औषधी मंडळाच्या वतीने परिषदेचे आयोजन करण्यात आले असून, परिषदेला कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर आणि जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतरे उपस्थित राहणार असल्याचे संघाचे उपाध्यक्ष रामचंद्र खेडेकर यांनी सांगितले.

**अधिक माहितीसाठी संपर्क**
**सुरेश सस्ते (सचिव), ९८८१४१३०८९**
**रामचंद्र खेडेकर,९४२१०१७६५७**

# यंदा मध्यम पावसाचे संकेत

**सोलापूर (प्रतिनिधी) :** ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेतील भाकणुकीचा कार्यक्रम रविवारी (ता.१४) मध्यरात्री झाला. त्या वेळी वासराने केलेल्या भाकणुकीत यंदाच्या हंगामात मध्यम पाऊस आणि लाल वस्तू महाग होणार असल्याचे संकेत मिळाले.

सिद्धेश्वर यात्रेत मकरसंक्रांतीदिवशी होमविधीचा सोहळा होता. मध्यरात्री दोनच्या सुमारास मंदिराजवळच्या फडकुले सभागृहासमोर वासराची भाकणूक झाली. मानकरी देशमुख यांच्या या वासराला दिवसभर उपाशी ठेवण्यात येते. रात्री भाकणुकीवेळी त्याला इथे आणण्यात येते. ते सर्वप्रथम ज्या वस्तुला स्पर्श करेल, त्या वस्तू महागणार असे संकेत दिले जातात.

भाकणुकीवेळी वासरासमोर गूळ, तांदूळ, खोबरे, ऊस, गहू, बोरे, गाजर अशा वस्तू ठेवण्यात आल्या. वासराने आधी गुळाला स्पर्श केला. त्यानंतर गाजर खाल्ले, याचा अर्थ लाल वस्तू महाग होतील, असे मानकरी हिरेहब्बू यांनी सांगितले. वासरू काही काळ शांत राहिले, तसेच पाणीही त्याच्यासमोर ठेवले. त्याने काहीच प्रतिसाद दिला नाही, त्यावरून पाऊस मध्यम पडेल, असे मानकरी देशमुख यांनी सांगितले. या वेळी बसवराज देशमुख, सुदेश देशमुख, डॉ. किरण देशमुख, मनोज हिरेहब्बू आदी उपस्थित होते.

# केळी, हरभऱ्यावर कीड रोगांचा प्रादुर्भाव

**जळगाव (प्रतिनिधी) :** धुळ्यासह जळगाव जिल्ह्यांत मागील तीन दिवसांपासून ढगाळ हवामान आहे. यामुळे केळीसह हरभरा पिकावर कीड - रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. तसेच तापमानातही वाढ झाली असून, या प्रतिकूल स्थितीचा शेतकऱ्यांनी धसका घेतला आहे.

अनेक भागात अजून गहू निसवलेला नाही. हरभरा घाटे लागण्याच्या अवस्थेत आहे. काही भागातील आगाप लागवडीच्या हरभऱ्याचे घाटे पक्व होत आहेत. अशात तापमानवाढ, ढगाळ वातावरण याचा फटका या पिकाला बसत आहे. घाटे अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. गव्हालाही चिकटा रोगाचा प्रादुर्भाव वाढू शकतो, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

स्वच्छ सूर्यप्रकाशित वातावरण नसल्याने चार ते पाच महिने कालावधीच्या केळीवर करपा रोग वाढत आहे. ढगाळ वातावरण व त्यातच थंड वारे यामुळे घड पक्व होत नसल्याचे चित्र आहे. पाच ते सहा महिने कालावधीच्या केळी बागांमध्ये करपा रोगाचे प्रमाण चार ते पाच पाने एवढे आहे. धुळ्यासह जळगावात मागील चार पाच दिवसांपासून थंडी कमी होत आहे. कमाल तापमान १२ अंश सेल्सिअसपर्यंत आले आहे. पुढे तापमानात आणखी वाढ होईल, असे संकेत हवामानशास्त्र विभागाकडून मिळाले आहेत. थंडी कमी झाल्याने हरभरा व गहू यांचे सिंचन करण्याचे काम वेगात सुरू आहे. मागील महिन्यात म्हणजेच डिसेंबरमध्येही ढगाळ वातावरण होते. अगदी २५ डिसेंबरपर्यंत प्रतिकूल हवामान होते. नंतर स्वच्छ वातावरण झाले. आता शनिवारपासून (ता.१३) आणखी ढगाळ वातावरण आहे. अर्थातच फक्त १९ दिवस थंड व स्वच्छ वातावरण होते. त्याचा लाभ हरभरा व गव्हाला काही प्रमाणात झाला.

धुळ्यासह जळगाव जिल्ह्यात खरिपात कुठलेही पीक चांगले आले नाही. कपाशीची तर पुरती वाताहत गुलाबी बोंडअळीमुळे झाली. अशात आता या दोन्ही जिल्ह्यांमध्ये हरभरा प्रमुख पीक आहे. तर केळी पिकावर तापीकाठावरील अनेक गावांचे अर्थकारण अवलंबून आहे. ही दोन्ही पिके प्रतिकूल हवामानामुळे संकटात असल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

> **ढगाळ हवामानामुळे हरभऱ्यावर घाटे अळीचा प्रादुर्भाव वाढत आहे. आम्हाला सतत फवारण्या कराव्या लागत आहेत. त्यासाठी खर्च येत असून, उत्पादन खर्चात वाढ झाली आहे.**
> **- सुभाष काळे,** शेतकरी, कुऱ्हे पानाचे, ता. भुसावळ, जि. जळगाव.





सकाळ अॅग्रोवन आयोजित | व्यंकटेश अॅग्रोटेक प्रा. लि. नाशिक प्रायोजित

अॅग्रोवन संवाद

'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

**बुधवार, १७ जानेवारी २०१८**

विषय - डाळींब शेतीतील आव्हाने आणि संधी
वक्ते - श्री. प्रमोद देशमुख
(अध्यक्ष डाळिंब शास्त्रज्ञ मंच, म. फु. कृ. वि. राहुरी)
डॉ. प्रशांत नाईकवाडी (सेंद्रिय शेती अभ्यासक)
स्थळ - श्री. आंबिका मंगल कार्यालय, महालक्ष्मी कॉलनी शेजारी, परखतपुर रोड, मु. पो. ता. अकोले, जि. अहमदनगर, वेळ - सकाळी १० वाजता

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.